RNI No. MAHBIL /2009/35530
Reg. No. MH/MR/South-341/2014–16

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ६, अंक १२] मंगळवार, जून २४, २०१४/आषाढ ३, शके १९३६ [पृष्ठे १९, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक ३२**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

पृष्ठे

**सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३.—**महाराष्ट्र राज्यात उच्च शिक्षणांकरिता अमिटी विद्यापीठाची स्थापना करणे, त्याचे विधिद्वारा संस्थापन व विनियमन करणे यांकरिता आणि त्याच्याशी संबंधित व तद्नुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्यासाठी अधिनियम. .. .. .. .. .. १–१९

दिनांक २४ जून २०१४ रोजी मा. **राज्यपालांनी** संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**ह. बा. पटेल,**
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

---

**सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३.**

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर “ **महाराष्ट्र शासन राजपत्रात** ” दिनांक २४ जून २०१४ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र राज्यात उच्च शिक्षणाकरिता अमिटी विद्यापीठाची स्थापना करणे, त्याचे विधिद्वारा संस्थापन व विनियमन करणे यांकरिता आणि त्याच्याशी संबंधित व तद्नुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्यासाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी,** राज्यात अमिटी विद्यापीठ या नावाने स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठाची स्थापना करण्यासाठी, त्याचे विधिद्वारा संस्थापन व विनियमन करण्यासाठी तरतूद करणे इष्ट आहे ;

**त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या पासष्टाव्या वर्षी, याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, अमिटी विद्यापीठ अधिनियम, २०१४ असे म्हणावे.

(२) तो, राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास अंमलात येईल.

व्याख्या.

**२.** या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(एक) " व्यवस्थापन मंडळ " याचा अर्थ, या अधिनियमाच्या कलम २२ अन्वये घटित केलेले व्यवस्थापन मंडळ, असा आहे ;

(दोन) " विद्यापीठ क्षेत्र " याचा अर्थ, जेथे विद्यापीठ स्थापन केले असेल असे विद्यापीठाचे क्षेत्र, असा आहे ;

(तीन) " दूरस्थ शिक्षण " याचा अर्थ, प्रक्षेपण, दूरप्रक्षेपण, पत्रव्यवहाराद्वारे पाठ्यक्रम, चर्चा सत्रे, संपर्क कार्यक्रम किंवा अशी इतर कोणतीही पद्धती यांसारख्या संज्ञापनाच्या कोणत्याही दोन किंवा अधिक संयुक्त माध्यमांद्वारे देण्यात येणारे शिक्षण असा आहे ;

(चार) " कर्मचारी " याचा अर्थ, विद्यापीठाने नियुक्त केलेली कोणतीही व्यक्ती, असा आहे, आणि त्यात विद्यापीठाचे अध्यापक, अधिकारी व इतर कर्मचारी, यांचा समावेश आहे ;

(पाच) " फी " याचा अर्थ, विद्यापीठाने किंवा त्याची महाविद्यालये, संस्था किंवा यथास्थिती, अभ्यासकेंद्रे यांनी, परतावायोग्य नसेल अशी, विद्यार्थ्यांकडून गोळा केलेली द्रव्य विषयक रक्कम, मग ती कोणत्याही नावाने संबोधण्यात येवो, असा आहे ;

(सहा) " शासन " किंवा " राज्य शासन " याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे ;

(सात) " नियामक मंडळ " याचा अर्थ, या अधिनियमाच्या कलम २१ अन्वये घटित केलेले नियामक मंडळ, असा आहे ;

(आठ) " उच्च शिक्षण " याचा अर्थ, शालेय शिक्षणाच्या टप्प्यावरील शिक्षणानंतरचा ज्ञानाचा व्यासंग, असा आहे ;

(नऊ) " वसतिगृह " याचा अर्थ, विद्यापीठाकडून स्थापन करण्यात आलेले किंवा त्याने मान्यता दिलेले असे, विद्यापीठाच्या त्याच्या संस्थांच्या आणि अभ्यासकेंद्रांच्या विद्यार्थ्यांसाठी असलेले निवासस्थान, असा आहे ;

(दहा) " अधिसूचना " याचा अर्थ, शासकीय **राजपत्रात**, प्रसिद्ध झालेली अधिसूचना, असा आहे ;

(अकरा) " शासकीय राजपत्र " याचा अर्थ, **राजपत्र**, महाराष्ट्र, असा आहे ;

(बारा) " विहित " याचा अर्थ, या अधिनियमान्वये किंवा या अधिनियमाद्वारे करण्यात आलेले परिनियम किंवा आदेश किंवा विनियम, यथास्थिती, यांद्वारे विहित केलेले, असा आहे ;

(तेरा) " नियामक मंडळ " याचा अर्थ, उच्च शिक्षणाची विद्याविषयक मानके पूर्ण होण्यासाठी, मानके व शर्ती घालून देण्याकरिता केंद्र सरकारने विद्यापीठ अनुदान आयोग, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, राष्ट्रीय तंत्र शिक्षण परिषद, भारतीय वैद्यक परिषद, भारतीय औषधनिर्माण विद्या परिषद, राष्ट्रीय मूल्यमापन व अधिस्वीकृती परिषद, भारतीय कृषि संशोधन परिषद, दूरस्थ शिक्षण परिषद, भारतीय वैज्ञानिक व संशोधन परिषद इत्यादीं सारखे स्थापन केलेले मंडळ, असा आहे ; आणि त्यात शासनाचा समावेश आहे.

(चौदा) " कलम " याचा अर्थ, या अधिनियमाचे कलम, असा आहे ;

(पंधरा) " प्रायोजक मंडळ " याचा अर्थ, सोसायटी नोंदणी अधिनियम, १८६० याअन्वये म्हणून नोंदणी करण्यात आलेले रीतनंद बलवेद एज्युकेशन फाऊंडेशन, नवी दिल्ली, असा आहे ; १८६० चा २१.

(सोळा) " राज्य " याचा अर्थ, महाराष्ट्र राज्य, असा आहे ;

(सतरा) " परिनियम ", " आदेश " किंवा " विनियम " याचा अर्थ, या अधिनियमान्वये तयार केलेले अनुक्रमे परिनियम, आदेश किंवा विनियम, असा आहे ;

(अठारा) " विद्यार्थी " याचा अर्थ, विद्यापीठाची पदवी, पदविका किंवा संशोधनाच्या पदवीसह अन्य विद्याविषयक विशेषोपाधी मिळविण्याकरिता विद्यापीठात नाव नोंदणी केलेली व्यक्ती, असा आहे ;

(एकोणीस) " अभ्यास केंद्र " याचा अर्थ, दूरस्थ शिक्षणाच्या संदर्भात विद्यार्थ्यांना सल्ला देणे, समुपदेशन करणे किंवा विद्यार्थ्यांना आवश्यक असेल असे कोणतेही सहाय्य देण्याच्या प्रयोजनाकरिता, विद्यापीठाकडून स्थापन करण्यात आलेले व चालविण्यात येणारे किंवा मान्यताप्राप्त असलेले एखादे केंद्र, असा आहे ;

(वीस) " अध्यापक " याचा अर्थ, विद्यापीठाचा एखादा पाठ्यक्रम पूरा करण्याच्या कामी विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी किंवा संशोधनात मार्गदर्शन करण्यासाठी किंवा कोणत्याही प्रकारचे सहाय्य देण्यासाठी, आवश्यक असलेले प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक किंवा इतर कोणतीही व्यक्ती, असा आहे ;

(एकवीस) " विद्यापीठ " याचा अर्थ, अमिटी विद्यापीठ, पनवेल, असा आहे.

विधिद्वारा संस्थापन.

**३.** (१) अमिटी विद्यापीठ, पनवेल नावाचे एक विद्यापीठ स्थापन करण्यात येईल.

(२) अध्यक्ष, कुलगुरू, नियामक मंडळ, व्यवस्थापन मंडळ, विद्यापरिषद यांचा व यानंतर असे अधिकारी किंवा सदस्य होतील अशा सर्व व्यक्ती, जोवर त्या असे पद किंवा सदस्यत्व धारण करीत राहतील तोवर अशा इतर सर्व व्यक्ती यांचा मिळून याद्वारे " अमिटी विद्यापीठ " नावाचा एक नियमनिकाय घटित करण्यात येईल.

(३) विद्यापीठास अखंड परंपरा व सामाईक मोहोर असेल आणि त्यास किंवा त्याच्याविरुद्ध उक्त नावाने दावा दाखल करता येईल.

(४) विद्यापीठ, या अधिनियमान्वये स्थापन केलेले एक असंलग्न विद्यापीठ म्हणून कार्य करील आणि ते, त्या विद्यापीठामधील विद्यार्थ्यांना पदवी, पदविका व त्यांच्या पदव्यांचे प्रमाणपत्र प्रदान करण्याकरिता कोणत्याही इतर महाविद्यालयाशी किंवा संस्थांशी संलग्न असणार नाही.

(५) विद्यापीठ, भातान, पनवेल, महाराष्ट्र येथे स्थित असेल व तेच त्याचे मुख्यालय असेल.

विद्यापीठाची उद्दिष्टे.

**४.** विद्यापीठाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत :—

(क) उच्च व तंत्र शिक्षणामध्ये अभियांत्रिकी, तंत्रज्ञान, व्यवस्थापन, व्यवसाय व वाणिज्य, उपयोजित व सृजनात्मक कला, व्यावसायिक शिक्षण, प्रसारमाध्यम, माहिती व दळणवळण तंत्रज्ञान व स्वभावतः शिक्षण व त्यांच्या अध्ययनाच्या विविध विद्याशाखा विषयक अभ्यासक्रम व विकास यांसारख्या मुक्त कला, मानव्य विद्या, सामाजिक शास्त्रे, जीवन शास्त्रे आणि जैव तंत्रज्ञाने, लघुतम (नॅनो) शास्त्रे व तंत्रज्ञाने, व्यावसायिक विद्याशाखा यांचा अंतर्भाव करुन अध्ययन, अध्यापन क्षमता, कर्तृत्व व कौशल्य विकास आणि संशोधन व विकास यांची तरतूद करणे ;

(ख) उच्च व तंत्र शिक्षण, कला, क्रीडा, संस्कृती, फिल्म, अवकाश तंत्रज्ञान, सागरी संशोधन या विषयांमधील शिक्षण, अध्यापन व प्रशिक्षण देणे, आणि संशोधनासाठी तरतूद करणे ;

(ग) उच्चस्तरीय अशी बोधात्मक, भावात्मक आणि मनोकारक (मस्तक, हृदय आणि हस्त) क्षमता निर्माण करणे ;

(घ) उच्च प्रतीची बौद्धिक क्षमता निर्माण करणे ;

(ङ) विकास व सामाजिक पुनर्रचना आणि परिवर्तन याकरिता नवीन मार्ग शोधून त्याद्वारे सर्जनशीलता, अभिनव उपक्रम आणि उद्यमशीलता यांना चालना देण्यासाठी नवनवीन शैक्षणिक कार्यक्रम निर्माण करणे आणि त्यांचा जास्तीत जास्त चांगला वापर करणे ;

(च) शिक्षण आणि विकास यासाठी अत्याधुनिक सुविधा निर्माण करणे ;

(छ) अध्यापन व संशोधन करणे आणि निरंतर गुणवत्ता शिक्षणाचे कार्यक्रम उपलब्ध करून देणे ;

(ज) विज्ञान व तंत्रज्ञान या विषयात आणि सामाजिक व आर्थिक विकासात संशोधन व विकास करण्याकरिता आणि ज्ञानाचे आदानप्रदान व उपयोजन करण्याकरिता उत्कृष्ट केंद्रांची निर्माण करणे ;

(झ) व्यक्तिगत आणि २१ व्या शतकातील समाज यांच्याकरिता अध्ययन, अध्यापन, संशोधन, मूल्यमापन, विकास, संघटन व निर्मिती करणे व सामाजिक व आर्थिक संपत्तीचे व्यवस्थापन करणे आणि यासाठी आधुनिक आणि आधुनिकोत्तर प्रक्रिया, यंत्रणा व तंत्रज्ञान यांचा वापर करणे ;

(ञ) उद्योग आणि सार्वजनिक संघटना आणि समाज यांना व्यावसायिक व विकासविषयक सेवा पुरविणे ;

(ट) नवीन व नव्याने उदयाला येत असलेल्या क्षेत्रामध्ये अभिनव कार्यक्रमांसह उच्च शिक्षणाचे कार्यक्रम, अभ्यासक्रम सुरू करणे ;

(ठ) भारतातील आणि परदेशातील इतर उच्च शिक्षण व संशोधन संस्थांशी संबंध, सहयोग आणि भागीदारी प्रस्थापित करणे ;

(ड) परीक्षांच्या आधारे, किंवा मूल्यमापनाच्या अन्य कोणत्याही पद्धतीच्या आधारे पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे आणि इतर विद्याविषयक विशेषोपाधी देण्याचे सुरू करणे ;

(ढ) अभिनव दृष्टिकोन प्रस्थापित व्हावा म्हणून, विद्याविषयक संरचना-पद्धती, अध्ययन समयचौकट यांमध्ये एकसंघता निर्माण करणे आणि सर्जनशीलता व उद्यमशीलता यांचे पोषण करून तसेच त्यांची योग्य जोपासन होण्यासाठी कार्यक्षम व मूल्यमापन प्रक्रिया सातत्याने करीत राहणे ;

(ण) शासनाने सुचवलेल्या अन्य कोणत्याही उद्दिष्टांचा पाठपुरावा करणे ;

(त) विद्यापीठाने प्रदान केलेल्या पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे आणि इतर विद्याविषयक विशेषोपाधी या, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने किंवा राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद अधिनियम, १९९३ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषदेने किंवा विद्यापीठ अनुदान आयोग अधिनियम, १९५६ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या विद्यापीठ अनुदान आयोगाने किंवा औषधशास्त्र अधिनियम, १९४८ अन्वये घटित करण्यात आलेल्या भारतीय औषधशास्त्र परिषदेने किंवा अधिवक्ता अधिनियम, १९६१ अन्वये घटित करण्यात आलेल्या भारतीय विधि परिषदेने किंवा, यथास्थिती, इतर कोणत्याही सांविधिक मंडळाने निर्धारित केलेल्या दर्जापेक्षा कमी दर्जाच्या नसतील, याची सुनिश्चिती करणे.

१९९३ चा ७३.
१९५६ चा ३.
१९४८ चा ८.
१९६१ चा २५.

अधिकार व कार्ये.

**५.** विद्यापीठाचे अधिकार व कर्तव्ये पुढीलप्रमाणे असतील :—

(एक) पारंपरिक तसेच नवीन नवोपक्रमशील पद्धतीच्यामार्फत ऑनलाईन शिक्षण पद्धतीसह पाठ्यक्रमासंबंधातील अध्ययन, अध्यापन व संशोधन, यांच्याबाबतीत तरतुदी करणे व सर्व उपाययोजना (अभ्यासक्रमांची स्वीकृती व अद्यायावत करणे यांसह) स्वीकृत करणे ;

(दोन) पदव्या, पदविका, प्रमाणपत्र, पुरस्कार, श्रेणी, श्रेयांक, व विद्याविषयक विशेषोपाधी सुरू करणे व प्रदान करणे ;

(तीन) परीक्षा आयोजित करणे व घेणे ;

(चार) इतर मान्यताप्राप्त विद्यापीठे, मंडळे किंवा परिषदा यांच्या पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे यांच्याशी समतूल्य किंवा त्यांसंबंधित असा पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे यांची तरतूद करणे ;

(पाच) विद्यापीठ क्षेत्र उभारण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना हाती घेणे ;

(सहा) मध्यवर्ती ग्रंथालये, विभागीय ग्रंथालये, संग्रहालये व संलग्न बाबी उभारणे ;

(सात) विहित करण्यात येईल त्याप्रमाणे, सन्मान्य पदव्या सुरू करणे व प्रदान करणे ;

(आठ) विहित करण्यात येईल त्याप्रमामे, अधिछात्रवृत्त्या, शिष्यवृत्त्या, छात्रवृत्त्या सुरू करणे व देणे ;

(नऊ) समाजातील शैक्षणिकृष्ट्या मागास असलेल्या वर्गांमध्ये शिक्षणविषयक सुविधांचा प्रचार करण्यासाठी विशेष उपाययोजना करणे ;

(दहा) क्रीडा व इतर पाठ्येतर कार्यक्रमांना उत्तेजन देणे व त्यांचे प्रचालन करणे ;

(अकरा) तांत्रिक, प्रशासकीय व इतर आवश्यक पदे निर्माण करणे व त्यासाठी नियुक्त्या करणे ;

(बारा) परस्पर स्वीकार्य असतील असा अटी व शर्तीवर संशोधन प्रकल्प हाती घेणे ;

(तेरा) संमतक सेव पुरविणे ;

(चौदा) या अधिनियमाच्या तरतुदींनुसार विद्यापीठाची उद्दिष्ट्ये पार पाडण्यासाठी परिनियम, आदेश, नियम व विनियम तयार करणे ;

(पंधरा) विद्यापीठाचे शिक्षक, विद्यार्थी व कर्मचारी यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी अभ्यासानुवर्ती उपक्रमांना प्रोत्साहन देणे त्याचे प्रचालन करणे ;

(सोळा) राज्य शासन, भारत सरकार व विद्यापीठ अनुदान आयोग यांच्या अनुदेशांप्रमाणे देशांतर्गत व देशाबाहेरील विद्यापीठांसोबत परस्पर सहाय्य तत्त्वावर दुहेरी पदवी, पदविका किंवा प्रमाणपत्र विचारात घेऊन इतर विद्यापीठांप्रमाणे शिक्षण पुरविणे ;

(सतरा) विद्यापीठाच्या शैक्षणिक कार्यक्रमांमधील वेगवेगळ्या ज्ञानशाखेमध्ये एकात्मिकृत पाठ्यक्रमांसाठी अशा तरतुदी करणे ;

(अठरा) राज्य शासन, केंद्र सरकार व विद्यापीठ अनुदान आयोगामार्फत यांनी वेळोवेळी दिलेल्या अनुदेशांनुसार महाविद्यालये, परिसंस्था, विस्तारित केंद्र, विस्तारित परिसर उपकेंद्र व अभ्यास केंद्र उभारणे ;

(एकोणीस) विद्यापीठाच्या प्रयोजनार्थ व उद्दिष्टांसाठी देणगी, दान व अनुदान स्वीकारणे आणि महाराष्ट्राच्या आत किंवा बाहेर, न्यास किंवा दानोपजीवी मालमत्तेसह कोणतीही स्थावर किंवा जंगम मालमत्ता संपादित करणे, धारण करणे, व्यवस्थापन करणे किंवा तिची विल्हेवाट लावणे आणि विद्यापीठाला योग्य वाटेल अशारितीने निधीची गुंतवणूक करणे ;

(वीस) या अधिनियमाच्या तरतुदींनुसार विविध अभ्यासक्रमांसाठी वेळोवेळी शुल्क रचना विहित करणे ;

(एकवीस) वेळोवेळी विनिर्दिष्ट करण्यात येईल त्याप्रमाणे अशा शुल्काच्या रकमेची मागणी करणे व ती रक्कम स्वीकारणे ;

(बावीस) परस्पर मान्य अशा अटी व शर्तीवर इतर परिसंस्थांबरोबर सहयोग साधणे ;

(तेवीस) विद्यापीठ अनुदान आयोगाने आणि इतर नियामक मंडळांनी विनिर्दिष्ट केलेल्या मानकांना अनुसरून विद्यापीठाचे अध्यापक व कर्मचारी यांचे वेतन पारिश्रमिक, मानधन निश्चित करणे ;

(चोवीस) बहि:शाल अध्यापन व विस्तारित सेवा आयोजित करणे व उपक्रम हाती घेणे ;

(पंचवीस) सभागृहे व वसतिगृहे स्थापन करणे व ती चालवणे ;

(सव्वीस) विद्यापीठाकडून चालवली न जाणारी सभागृहे व वसतिगृहे आणि विद्यार्थ्यांना निवासासाठी इतर निवासव्यवस्थेला मान्यता देणे, पर्यवेक्षण करणे व नियंत्रण ठेवणे आणि अशी कोणतीही मान्यता काढून घेणे ;

(सत्तावीस) विद्यापीठाचे विद्यार्थी व कर्मचारी यांच्याकडे शिस्तीचे विनियमन करणे व ती लागू करणे आणि आवश्यक वाटेल अशी शिस्तविषयक उपाययोजना करणे ;

(अठ्ठावीस) विद्यापीठाचे विद्यार्थी व कर्मचारी यांचे आरोग्य व सर्वसामान्य कल्याण यांचे प्रचालन करण्यासाठी व्यवस्था करणे ;

(एकोणतीस) वेळोवेळी विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा अटी व शर्तीवर मान्य करण्यात येईल त्याप्रमाणे अशा प्रयोजनांसाठी, त्या विद्यापाठीच्या समान प्रयोजनांना व उद्दिष्टांना चालना देण्याचा दृष्टीकोन लक्षात घेऊन, देशातील व देशाबाहेरील कोणतेही इतर विद्यापीठ, प्राधिकरण किंवा कोणतेही सार्वजनिक किंवा खाजगी मंडळ यांना सहकार्य करणे ;

(तीस) विद्यापीठाकडून प्रसिद्ध करण्यात येतील अशा पाठ्यपुस्तकांसह संशोधन व इतर कामांचे छपाई, पुनर्छपाई व प्रकाशन यांकरिता तरतूद करणे ;

(एकतीस) विद्यापाठीचे सर्व किंवा कोणतेही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आवश्यक आनुषंगिक किंवा हितारक असतील अशा सर्व गोष्टी करणे ;

(बत्तीस) विद्यापाठाचे वरील अधिकार, कर्तव्ये व जबाबदाऱ्या यांच्या संदर्भात, राज्य शासनाकडून वेळोवेळी देण्यात आलेल्या निदेशांचे अनुपालन करणे व ते पार पाडणे ;

(तेहतीस) विद्यापीठ अनुदान आयोग (खाजगी विद्यापीठांची स्थापना व मानकांचे परिरक्षण) विनियम, २००३ किंवा विद्यापीठ अनुदान आयोगाने वेळोवेळी केलेले इतर कोणतेही विनियम किंवा दिलेले निदेश यांच्या तरतुदींचे पालन करणे आणि त्यांचे अनुसरण करणे.

विद्यापीठ सर्वांसाठी खुले असणे.

**६.** (१) भारताच्या कोणत्याही नागरिकास लिंग, वंश, पंथ, वर्ग, जात, जन्मस्थान, धर्मश्रद्धा किंवा व्यवसाय किंवा राजकीय किंवा इतर मतप्रणाली केवळ याचे कारणावरून विद्यापीठाच्या कोणत्याही पदापासून किंवा त्याच्या प्राधिकरणांपैकी, मंडळापैकी किंवा समित्यांपैकी कोणत्याही प्राधिकरणाचे, मंडळाचे किंवा समितीचे सदस्यत्व मिळण्यापासून किंवा कोणत्याही पदावरील नेमणुकीपासून किंवा कोणतीही पदवी, पदविका, प्रमाणपत्र किंवा इतर विद्याविषयक विशेषोपाधी किंवा अभ्यासक्रम यासाठी प्रवेश मिळवण्यापासून, वगळण्यात येणार नाही ;

(२) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती, विमुक्त जाती/भटक्या जमाती व इतर मागासवर्ग यांसाठी विद्यापीठ विभागांमध्ये व परिसंस्थामध्ये विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याच्या प्रयोजनांकरिता, विद्यापीठ राखीव जागा ठेवण्यासंबंधातील शासनाचे धोरण व शासनाने वेळोवेळी दिलेले आदेश यांचे पालन करील.

(३) विद्यापीठ, राज्य शासनाकडून वेळोवेळी निदेश देण्यात येईल त्यानुसार, समाजातील दुर्बल घठकांच्या विविध प्रवर्गांच्या व अल्पसंख्याकांच्या कल्याणासंबंधात, राज्य शासनाच्या सर्वसाधारण धोरणाचा अवलंब करील.

विद्यापीठ स्वयंअर्थसहाय्यित असणे.

**७.** विद्यापीठ हे स्वयंअर्थसहाय्यित असेल व शासनाकडून कोणतेही अनुदान किंवा इतर वित्तीय सहाय्य स्वीकरण्यास हक्कदार नसेल.

दाननिधी

**८.** (१) प्रायोजक मंडळ, विद्यापीठासाठी पाच कोटी रुपये इतक्या रकमेचा स्थायी सांविधिक दाननिधी स्थापन करील. तो निधी स्वाधिकाराने वाढवता येऊ शकेल पण कमी करता येणार नाही.

(२) या अधिनियमाच्या त्याखाली केलेले नियम, विनियम, परिनियम किंवा आदेश यांच्या तरतुदींचे काटेकोर अनुपालनाची सुनिश्चिती करण्यासाठी दाननिधी हा प्रतिभूती ठेव म्हणून ठेवण्यात येईल.

(३) विद्यापाठी किंवा प्रायोजक मंडळ हे या अधिनियमाच्या तरतुदी आणि त्याखाली केलेले कोणताही नियम, परिनियम, आदेश किंवा विनियम यांचे अल्लंघन करीत असल्यास अशा कोणत्याही प्रकरणी शासनाला, दाननिधीचा काही भाग किंवा संपूर्ण दाननिधी विहित रीतीने सरकारजमा करण्याचा अधिकार असेल.

(४) दाननिधीमधून मिळणाऱ्या उत्पन्नाचा वापर विद्यापीठाच्या पायाभूत सोयींचा विकास करण्यासाठी करण्यात येईल, मात्र विद्यापाठीचा आवर्ती खर्च भागविण्यासाठी त्याचा वापर करता येणार नाही.

(५) दाननिधीची रक्कम ही, विद्यापीठाचे विसर्जन होईपर्यंत हा निधी शासनाच्या परवानगीशिवाय काढण्यात येणार नाही या अटीस अधीन राहन शासनाकडून प्राप्त झालेल्या किंवा हमी मिळालेल्या दीर्घ मुदतीच्या रोख्यांमध्ये गुंतवण्यात येईल.

(६) दीर्घ मुदतीच्या रोख्यांतील गुंतवणुकीच्या रोख्यांची प्रमाणपत्रे सुरक्षितपणे शासनाच्या ताब्यात ठेवण्यात येतील आणि पोट-कलम (३) मध्ये नमूद केलेल्या प्रयोजनांकरिता शासनाला, रोख्यांचे रोखीकरण करण्याचे अधिकार असतील.

सर्वसाधारण निधी.

**९.** विद्यापीठ,—

(एक) विद्यापीठाला प्राप्त झालेली फी व इतर शुल्के ;

(दोन) प्रायोजक मंडळाने दिलेले कोणतेही अंशदान ;

(तीन) समंत्रक आणि विद्यापीठामार्फत हाती घेण्यात आलेले इतर उपक्रम यामधून मिळणारे कोणतेही उत्पन्न ;

(चार) मृत्यूपत्रित दान, देणगी, दाननिधी व इतर कोणतेही अनुदाने ; आणि

(पाच) विद्यापीठाला प्राप्त झालेल्या सर्व इतर रकमा.

यांचा अंतर्भाव असलेल्या सर्वसाधारण निधी म्हणून संबोधला जाणारा निधीदेखील स्थापन करील.

सर्वसाधारण निधीचा वापर.

**१०.** सर्वसाधारण निधीचा वापर विद्यापीठाचा कारभार चालविण्यासंबंधात सर्व आवर्ती किंवा अनावर्ती खर्च भागविण्यासाठी वापरण्यात येईल :

परंतु, व्यवस्थापकीय मंडळाच्या पूर्व परवानगीशिवाय, व्यवस्थापकीय मंडळाकडून निश्चित केले जाईल त्याप्रमाणे एका वर्षासाठी एकूण आवर्ती खर्चाच्या व एकूण अनावर्ती खर्चाच्या मर्यादेपेक्षा अधिक खर्च विद्यापीठाकडून करता येणार नाही.

**११.** प्रत्येक विद्यापीठामध्ये पुढील अधिकारी असतील :— विद्यापीठाचे अधिकारी.

(एक) अध्यक्ष ;

(दोन) कुलगुरु ;

(तीन) विद्याशाखाचे अधिष्ठाते ;

(चार) कुलसचिव ;

(पाच) वित्त व लेखा अधिकारी ;

(सहा) परीक्षा नियंत्रक ; आणि

(सात) विद्यापीठाचे अधिकारी म्हणून परिनियमांद्वारे घोषित करण्यात येतील अशा, विद्यापीठाच्या सेवेतील इतर व्यक्ती.

**१२.** (१) प्रायोजक मंडळ अशा रितीने शासनाच्या मान्यतेने तीन वर्षांच्या कालावधीसाठी अध्याक्षाची नियुक्ती करील. अध्यक्ष.

(२) अध्यक्ष पदासाठीची पात्रता व निकष हे राज्य शासनाकडून नियम व विनियमांद्वारे विहित करण्यात येतील.

(३) अध्यक्ष हा विद्यापीठाचा प्रमुख असेल.

(४) अध्यक्ष हा नियामक मंडळाच्या बैठकींचे व पदवी, पदविका किंवा इतर विद्याविषयक विशेषोपाधी प्रदान करण्यसाठीच्या दीक्षान्त समारंभाचे अध्यक्षपद भूषवील.

(५) अध्यक्षाला पुढील अधिकार असतील :—

(क) कोणतीही माहिती किंवा अहवाल मागविणे ;

(ख) कुलगुरुची नियुक्ती करणे ;

(ग) या अधिनियमाच्या कलम १४ च्या पोट-कलम (७) च्या तरतुदींनुसार कुलगुरुला पदावरून दूर करणे ;

(घ) परिनियमांद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येतील असे इतर अधिकार.

**१३.** अध्यक्षपद धारण करणारी व्यक्ती ही,— अध्यक्षाला पदावरून दूर करणे.

(क) भ्रमिष्ट झाली आहे आणि सक्षम न्यायालयाने तसे जाहीर केले आहे ;

(ख) नैतिक अधःपतन अंतर्भूत असलेल्या कोणत्याही अपराधाकरिता न्यायालयाकडून दोषी ठरविण्यात आलेली आहे ;

(ग) अमुक्त नादार झालेली आहे आणि सक्षम न्यायालयाकडून ती तशी झाल्याचे घोषित करण्यात आले आहे ;

(घ) प्रदीर्घ काळाच्या आजारामुळे किंवा विकलांगामुळे ती शारीरिकदृष्ट्या अपात्र झाली आहे आणि पदाची कार्ये पार पाडण्यास असमर्थ झालेली आहे ; किंवा

(ङ) तिने या अधिनियमाच्या तरतुदी पार पाडण्याचे हेतुपुरस्सर टाळले आहे किंवा त्याला नकार दिला आहे ; किंवा सेवा संविदेच्या कोणत्याही अटी व शर्तींचा किंवा, परिनियमांद्वारे निर्धारित केलेल्या अन्य कोणत्याही शर्तींचा भंग केला आहे ; किंवा तिच्याकडे निहित असलेल्या अधिकारांचा दुरुपयोग केला आहे किंवा ती अध्यक्ष म्हणून त्या पदावर असण्याचे चालू ठेवणे विद्यापीठाच्या दृष्टीने अहितकारक झाले आहे.

याबद्दल प्रायोजक मंडळाची खात्री पटली तर, प्रायोजक मंडळ तिला त्या पदावरून दूर करू शकेल :

परंतु, खंड (घ) किंवा (ङ) अन्वये अध्यक्षाला उक्त पदावरून दूर करण्यापूर्वी प्रायोजक मंडळाकडून, त्याला कारणे दाखविण्याची वाजवी संधी देण्यात येईल.

कुलगुरू.

**१४.** (१) कुलगुरूची नियुक्ती, नियामक मंडळाने शिफारस केलेल्या तीन व्यक्तींच्या नामिकेमधून, परिनियमाद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा अटीं व शर्तींवर अध्यक्षाकडून करण्यात येईल आणि तो, पोट-कलम (७) मध्ये अंतर्भूत असलेल्या तरतुदींना अधीन राहून, तीन वर्षांच्या मुदतीकरिता पद धारण करील :

परंतु, तीन वर्षांच्या मुदतीच्या समाप्तीनंतर, अशी व्यक्ती, आणखी तीन वर्षांच्या मुदतीसाठी पुर्ननियुक्तीस पात्र असेल :

परंतु आणखी असो की, कुलगुरू त्याची मुदत समाप्त झाली असली तरीही, नवीन कुलगुरू रुजू होईपर्यंत आपले पद धारण करण्याचे चालू ठेवील, तथापि, कोणत्याही प्रकरणात हा कालावधी एक वर्षाहून अधिक असणार नाही.

(२) कुलगुरू हा विद्यापीठाचा प्रमुख कार्यकारी व विद्याविषयक अधिकारी असेल आणि विद्यापीठाच्या कामकाजाचे पर्यवेक्षण करील आणि त्यावर नियंत्रण ठेवील आणि विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणांच्या निर्णयांची अंमलबजावणी करील.

(३) कुलगुरू, अध्यक्षाच्या अनुपस्थितीत विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभाचे अध्यक्षस्थान भूषवील.

(४) ज्या बाबींच्या संबंधात या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये, अन्य कोणत्याही प्राधिकरणाला अधिकार प्रदान करण्यात आले असतील अशा एखाद्या बाबतीत, तात्काळ कार्यवाही करणे आवश्यक आहे असे कुलगुरूचे मत असेल तर, तो, त्यास आवश्यक वाटेल अशी कार्यवाही करू शकेल त्यानंतर, लवकरात लवकर, अशी बाब सामान्यपणे नित्यक्रमाच्या ओघात ज्या अधिकाऱ्याने किंवा प्राधिकरणाने हाताळली असतील अशा अधिकाऱ्यास किंवा प्राधिकरणास, आपण केलेल्या कार्यवाहीसंबंधात कळवील :

परंतु, कुलगुरूने अशी कार्यवाही करावयास नको होती, असे संबंधित अधिकाऱ्याचे किंवा प्राधिकरणाचे मत असेल तर, असे प्रकरण, अध्यक्षांकडे, विचारार्थ पाठवण्यात येईल व त्यावरील त्याचा निर्णय अंतिम असेल.

(५) कुलगुरूच्या मते, विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणाचा कोणताही निर्णय, हा अधिनियम किंवा त्याखाली करण्यात आलेले परिनियम, आदेश, विनियम किंवा नियम याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांच्या कक्षेबाहेरील असेल, किंवा विद्यापीठाच्या हितास बाधक ठरण्याची शक्यता असेल तर, तो, संबंधित प्राधिकरणाला निर्णयाच्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या आत आपला निर्णय बदलण्याची विनंती करील आणि प्राधिकरणाने, अशा निर्णयात पूर्णपणे किंवा अंशत: बदल करण्यास नकार दिला, किंवा पंधरा दिवसांच्या आत कोणताही निर्णय घेतला नाही तर, ती बाब, अध्यक्षांकडे विचारार्थ पाठवण्यात येईल आणि तीवरील त्याचा निर्णय अंतिम असेल.

(६) कुलगुरू, परिनियमांद्वारे किंवा आदेशाद्वारे विहित करण्यात येतील अशा अधिकारांचा वापर करील व अशी कर्तव्ये पार पाडील.

(७) प्रतिवेदन मिळाल्यावर, किंवा अन्यथा आणि आवश्यक वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, कोणत्याही वेळी, परिस्थितीची निकड असेल तर, आणि कुलगुरू पदावर असण्याचे चालू राहणे विद्यापीठाच्या हिताचे नसेल तर, अध्यक्ष, नियामक मंडळाच्या मान्यतेने, लेखी आदेशाद्वारे, त्यात कारणे नमूद करून, आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दिनांकापासून कुलगुरूस, आपले पद सोडण्यास सांगू शकेल :

परंतु, या पोट-कलमान्वये कार्यवाही करण्यापूर्वी, कुलगुरूला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देण्यात येईल.

विद्याशाखांचे अधिष्ठाते.

**१५.** (१) विद्याशाखांच्या अधिष्ठात्यांची नियुक्ती ही परिनियमाद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा रीतीने आणि अशा सेवेच्या अटीं व शर्तींवर अध्यक्षांकडून करण्यात येईल.

(२) विद्याशाखांचे अधिष्ठाते हे, विद्यापीठाचे विद्याविषयक व इतर कामकाजाचे व्यवस्थापन करण्यासाठी कुलगुरूला सहाय्य करतील आणि ते विनियमाद्वारे विहित करण्यात येतील असा आणि अध्यक्ष व कुलगुरू यांच्याकडून सोपविण्यात येतील अशा अधिकारांचा वापर करतील आणि अशा कर्तव्यांचे पालन करतील.

कुलसचिव.

**१६.** (१) कुलसचिवाची नियुक्ती, परिनियमांद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा रीतीने आणि अशा सेवेच्या अटी व शर्तीवर अध्यक्षांकडून करण्यात येईल.

(२) कुलसचिव हा विद्यापीठाचा मुख्य प्रशासनिक अधिकारी असेल. विद्यापीठाच्या प्राधिकरणांच्या निर्णयास अधीन राहून, कुलसचिवास, विद्यापीठाच्या वतीने करार करण्याचा, संविदा करण्याचा, दस्तऐवजांवर स्वाक्षरी करण्याचा व अभिलेख अधिप्रमाणित करण्याचा अधिकार असेल. तो परिनियमाद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा अधिकारांचा वापर करील आणि अशी कर्तव्ये पार पाडील.

(३) कुलसचिव हा, नियामक मंडळाचा, व्यवस्थापन व विद्यापरिषद मंडळाचा सदस्य-सचिव असेल, परंतु त्यास मत देण्याचा हक्क नसेल.

(४) कुलसचिव हा विद्यापीठाच्या अभिलेख्यांच्या, सामाईक मुद्रेच्या आणि नियामक मंडळ त्याच्याकडे सुपूर्द करील अशा, विद्यापीठाच्या इतर मालमत्तेच्या अभिरक्षेसाठी जबाबदार असेल.

(५) कुलसचिव हा, अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये विहित करण्यात येतील अशा किंवा कुलगुरूकडून त्यास वेळोवेळी नेमून देण्यात येतील अशा इतर अधिकारांचा वापर करील व अशी इतर कर्तव्ये पार पाडील.

**१७.** (१) परीक्षा नियंत्रकाची नियुक्ती ही, परिनियमाद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा रीतीने आणि अशा सेवेच्या अटीं व शर्तींवर अध्यक्षाकडून करण्यात येईल. परीक्षा नियंत्रक.

(२) परीक्षा नियंत्रक हा, विद्यापीठाच्या परीक्षांचे व चाचणी परीक्षांचे आयोजन करणारा आणि त्यांचे निकाल घोषित करणारा मुख्य प्रभारी अधिकारी असेल. तो, कुलगुरू यांच्या अधीक्षणाखाली, निदेशनांखाली आणि मार्गदर्शनाखाली त्याची कार्ये पार पाडील.

तो विद्यापीठाचा पूर्णवेळ अधिकारी असेल आणि तो, थेटपणे विद्यापीठाच्या कुलगुरूच्या निदेशनाखाली आणि नियंत्रणाखाली काम करील. त्याची नियुक्ती ही तीन वर्षांच्या मुदतीसाठी असेल आणि तो तीन वर्षाच्या फक्त एका मुदतीसाठी पुनर्नियुक्तीसाठी पात्र असेल. नियंत्रकाच्या निवडीच्या प्रयोजनासाठी विहित करण्यात येईल अशी अर्हता व अनुभव असेल.

(३) परीक्षा नियंत्रक पुढील गोष्टींसाठी जबाबदार असेल :—

(क) परीक्षांची नियामिका तयार करणे व आगाऊ घोषित करणे ;

(ख) प्रश्नपत्रिकांच्या मुद्रणासाठीची व्यवस्था ;

(ग) परीक्षांचा आणि इतर चाचणी परीक्षांचा निकाल वेळेवर प्रसिद्ध करण्यासाठी व्यवस्था ;

(घ) उमेदवार, प्राश्निक, परीक्षक, नियामक किंवा परीक्षांशी संबंधित इतर कोणतीही व्यक्ती ही परीक्षांच्या संबंधात गैरप्रकाराबद्दल दोषी आढळली तर, जेथे आवश्यक असेल तेथे तिच्या विरोधात शिस्तभंगाची कारवाई करणे ;

(ङ) विद्यापीठ परीक्षांच्या निकालांचा वेळोवेळी आढावा घेणे आणि त्यावरील अहवाल विद्यापरिषदेकडे पाठवणे ;

(च) नियंत्रक हा, विहित करण्यात येईल अशा किंवा त्याला अभिहस्तांकित करण्यात येईल अशा इतर अधिकाराचा वापर करील आणि अशी इतर कर्तव्ये पार पाडील.

**१८.** (१) मुख्य वित्त व लेखा अधिकारी हा विद्यापीठाचा प्रमुख वित्त, लेखा व लेखापरीक्षा अधिकारी असेल. मुख्य वित्त व लेखा अधिकारी.

(२) मुख्य वित्त व लेखा अधिकाऱ्याची नियुक्ती, परिनियमांद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा रितीने आणि तो विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा अधिकारांचा वापर करील आणि अशी कर्तव्ये पार पाडील.

**१९.** (१) विद्यापीठास, आपली कार्ये पार पाडण्यासाठी आवश्यक असतील अशा इतर अधिकाऱ्यांची नियुक्ती करता येईल. इतर अधिकारी.

(२) विद्यापीठाच्या इतर अधिकाऱ्यांच्या नियुक्तीची रीत, आणि त्याचे अधिकार व कार्ये ही परिनियमाद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येतील अशी असतील.

विद्यापीठाची प्राधिकरणे.

**२०.** विद्यापीठाची प्राधिकरणे पुढीलप्रमाणे असतील :–

(क) नियामक मंडळ ;

(ख) व्यवस्थापन मंडळ ;

(ग) विद्यापरिषद ;

(घ) परीक्षा मंडळ ; आणि

(ङ) विद्यापीठाची प्राधिकरणे म्हणून परिनियमाद्वारे घोषित केल्याप्रमाणे अशी इतर प्राधिकरणे.

नियामक मंडळ.

**२१.** (१) विद्यापीठाच्या नियामक मंडळात पुढील सदस्यांचा अंतर्भाव असेल :–

(क) अध्यक्ष ;

(ख) कुलगुरू ;

(ग) प्रायोजक मंडळाकडून नामनिर्देशित केलेल्या पाच व्यक्ती ; ज्यापैकी दोन विख्यात शिक्षणतज्ज्ञ असतील ; अध्यक्षाने नामनिर्देशित केलेला विद्यापीठाबाहेरील व्यवस्थापन किंवा माहिती तंत्रज्ञान यातील एक तज्ज्ञ ;

(घ) राज्य शासनाने नामनिर्देशित केलेल्या दोन व्यक्ती ;

(ङ) अध्यक्षाने नामनिर्देशित करावयाचे उद्योगक्षेत्राचे दोन प्रतिनिधी ;

(च) विद्यापीठाचा कुलसचिव, जो नियामक मंडळाचा मतदान न करणारा आमंत्रित असेल.

(२) नियामक मंडळ, विद्यापीठाचे सर्वोच्च प्राधिकरण असेल.

(३) नियामक मंडळास पुढील अधिकार असतील :—

(क) हा अधिनियम किंवा परिनियम, आदेश, त्याखाली केलेले विनियम किंवा नियम याद्वारे तरतूद करण्यात आलेल्या अशा सर्व अधिकारांचा वापर करून सर्वसाधारण अधीक्षण व निदेशन याची तरतूद करणे आणि विद्यापीठाच्या कामकाजाचे नियंत्रण करणे ;

(ख) विद्यापीठाच्या इतर प्राधिरकणांच्या निर्णयाचा, जर ते या अधिनियमाच्या किंवा परिनियमाच्या, आदेशाच्या तरतुदींशी, त्याखाली केलेल्या विनियमांशी किंवा नियमांशी अनुरुप नसतील तर त्या बाबतीत, आढावा घेणे ;

(ग) विद्यापीठाच्या अर्थसंकल्पास व वार्षिक अहवालास मान्यता देणे ;

(घ) विद्यापीठाने अनुसरावयाच्या धोरणे निर्धारित करून देणे ;

(ङ) सर्व प्रयत्न करूनदेखील विद्यापीठाचे कामकाज जेव्हा सुरळीतपणे चालणे शक्य नाही अशी जर परिस्थिती उद्‌भवते तेव्हा विद्यापीठाच्या स्वेच्छा परिसमापनाविषयी प्रायोजक मंडळास शिफारस करणे ; आणि

(च) परिनियमाद्वारे विहित करण्यात येतील असे इतर अधिकार.

(४) नियामक मंडळ हे एका कॅलेंडर वर्षात किमान तीन वेळा बैठक घेईल.

(५) नियामक मंडळाच्या बैठकासाठीची गणपूर्ती पाच इतकी असेल.

व्यवस्थापन मंडळ.

**२२.** (१) व्यवस्थापन मंडळात पुढील सदस्यांचा अंतर्भाव असेल :—

(क) कुलगुरु ;

(ख) प्रायोजक मंडळाद्वारे नामनिर्देशित केलेले, नियामक मंडळाचे दोन सदस्य ;

(ग) कुलगुरुकडून आळीपाळीने, नामनिर्देशित करावयाचे विद्यापीठाचे दोन अधिष्ठाते ;

(घ) प्रायोजक मंडळाने नामनिर्देशित केलेल्या, ज्या नियामक मंडळाच्या सदस्य नसतील अशा, तीन व्यक्ती ; आणि

(ङ) प्रायोजक मंडळाने नामनिर्देशित केलेल्या, शिक्षकांमधील तीन व्यक्ती.

(२) कुलगुरु हा, व्यवस्थापन मंडळाचा अध्यक्ष असेल.

(३) व्यवस्थापन मंडळाचे अधिकार व कार्ये ही, परिनियमाद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येतील असे असतील.

(४) व्यवस्थापन मंडळ प्रत्येकी दोन महिन्यांमध्ये किमान एकदा बैठक बोलावील.

(५) व्यवस्थापन मंडळाच्या बैठकांसाठीची गणपूर्ति पाच इतकी असेल.

**२३.** (१) विद्यापरिषदेमध्ये, कुलगुरु आणि परिनियमाद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येतील असे इतर सदस्य यांचा अंतर्भाव असेल. विद्यापरिषद.

(२) कुलगुरु हा विद्यापरिषदेचा अध्यक्ष असेल.

(३) विद्यापरिषद ही, विद्यापीठाचा मुख्य शैक्षणिक निकाय असेल आणि या अधिनियमाच्या तरतुदींना आणि त्याखाली केलेल्या नियमांना, परिनियमांना व आदेशांना अधीन राहून समन्वय साधील आणि विद्यापीठाच्या शैक्षणिक धोरणाचे सर्वसाधारण पर्यवेक्षण करील.

(४) विद्यापरिषदेच्या बैठकांसाठीची गणपूर्ति ही, परिनियमाद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल अशी असेल.

**२४.** (१) परीक्षा मंडळ हे परीक्षांची आखणी तसेच, परीक्षांचे आयोजन करणे व त्या घेणे या संबंधात धोरणात्मक निर्णय घेणे, परीक्षा पद्धतीन सुधारणा करणे, प्राश्निक, परीक्षक, नियामक यांची नियुक्ती करणे व तसेच परीक्षांच्या तारखांचे वेळापत्रक तयार करणे आणि निकाल घोषित करणे यांसाठी असणारे प्राधिकरण असेल. अभ्यासकेंद्रे किंवा विद्यापीठाशी संबंधित कोणतेही केंद्र यांमध्ये घेण्यात येणाऱ्या परिक्षांवरदेखील परीक्षा मंडळ देखरेख करील व त्यांचे नियमन करील. परीक्षा मंडळ.

(२) परीक्षा मंडळ पुढील सदस्यांचे मिळून बनलेले असेल :—

(क) कुलगुरु —– अध्यक्ष ;

(ख) परीक्षा नियंत्रक —– सदस्य-सचिव ;

(ग) प्रत्येक विषयाचा प्राध्यापक —– सदस्य ;

(घ) परीक्षा मंडळाने स्वीकृत केलेला एक मूल्यमापन तज्ञ —– सदस्य.

(३) परीक्षा मंडळाचे अधिकारी, कार्ये आणि मुदत परिनियमांद्वारे निर्धारित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील.

**२५.** विद्यापीठाच्या इतर प्राधिकरणांची रचना, घटना, अधिकार व कार्ये परिनियमांद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येतील त्याप्रमाणे असतील. इतर प्राधिकरणे.

**२६.** एखादी व्यक्ती, पुढील कारणांवरून, विद्यापीठाच्या प्राधिकरणांपैकी किंवा मंडळापैकी कोणत्याही प्राधिकरणाचा किंवा मंडळाचा सदस्य होण्यास निरर्ह ठरेल :—

(एक) ती व्यक्ती विकल मनाची असेल आणि एखाद्या न्यायालयाने तिला तसे घोषित केलेले असेल ; किंवा

(दोन) ज्यात नैतिक अधःपतनाचा अंतर्भाव असेल अशा कोणत्याही अपराधाबद्दल जी दोषी ठरली असेल ; किंवा

(तीन) स्वतः खाजगी शिकवण्या घेत असेल किंवा खाजगी शिकवण्यांचे खास वर्ग चालवत असेल ; किंवा

(चार) कोणत्याही परीक्षा घेताना, कोणत्याही प्रकारे, कोठेही अनुचित व्यवहार केल्याबद्दल किंवा त्याला चालना दिल्याबद्दल जिला शिक्षा झालेली असेल.

**२७.** विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणाची किंवा मंडळाची कोणतीही कृती किंवा कार्यवाही ही केवळ त्याच्या सदस्यांपैकी कोणतेही पद रिक्त असणे किंवा त्याच्या रचनेत दोष असणे एवढ्याच कारणावरून " विधि अग्राह्य " ठरणार नाही. रिक्त पदांमुळे विद्यापीठाच्या प्राधिकरणांची किंवा मंडळाची कार्यवाही विधिअग्राह्य न ठरणे.

प्रासंगिक रिक्त पदे भरणे.

**२८.** एखाद्या सदस्याचा मृत्यू, त्याचा राजीनामा किंवा त्याला काढून टाकणे यांमुळे विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणातील किंवा मंडळातील कोणतेही प्रासंगिक पद रिक्त झाले असेल त्याबाबतीत, ते पद, ज्याचे पद रिक्त होईल त्याच्या जागी एखाद्या व्यक्तीची, नियुक्ती करण्यास सक्षम व्यक्तीद्वारे किंवा निकायाद्वारे नियुक्ती करून किंवा तिला नामनिर्देशत करून, शक्य तितक्या लवकर भरण्यात येईल आणि प्रासंगिक रिक्त पदावर नियुक्त केलेली किंवा नामनिर्देशित केलेली व्यक्ती ही, ज्याच्या जागी तिला सदस्य म्हणून घेतलेले असेल त्या सदस्याच्या उर्वरित मुदतीसाठी अशा प्राधिकरणाची किंवा मंडळाची सदस्य असेल.

समित्या.

**२९.** (१) विद्यापीठीच्या प्राधिकरणांना, विशिष्ट नियुक्तकार्य अशा समित्यांकडून पार पाडण्यासाठी आवश्यक असतील अशा समित्या, आवश्यक अशा विचारार्थ विषयांसह, घटित करता येतील.

(२) अशा समित्यांची रचना परिनियमांद्वारे विहित करण्यात येईल त्याप्रमाणे असेल.

पहिले परिनियम.

**३०.** (१) नियामक मंडळाकडून विद्यापीठाचे पहिले परिनियम करण्यात येतील आणि ते मान्यतेसाठी शासनाकडे सादर करण्यात येतील.

(२) या अधिनियमाच्या आणि त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींस अधीन राहून, पहिल्या परिनियमांत पुढील सर्व किंवा कोणत्याही बाबींसाठी तरतूद करता येईल :—

(क) वेळोवेळी घटित करण्यात येतील अशा, विद्यापीठाच्या प्राधिकरणांची आणि इतर मंडळांची रचना, अधिकार आणि कार्ये ;

(ख) कुलगुरुच्या नियुक्तीच्या अटी व शर्ती आणि त्याचे अधिकार व कार्ये ;

(ग) विद्याशाखांचे अधिष्ठाता, कुलसचिव आणि वित्त व लेखा अधिकारी यांच्या नियुक्तीची रीत आणि त्यांच्या सेवेच्या अटी व शर्ती आणि त्यांचे अधिकार व कार्ये ;

(घ) कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीची रीत आणि त्यांच्या सेवेच्या अटी व शर्ती आणि त्यांचे अधिकार व कार्ये ;

(ङ) विद्यापीठाच्या कर्मचाऱ्यांच्या सेवेच्या अटी व शर्ती ;

(च) कर्मचारी, विद्यार्थी आणि विद्यापीठ यांच्यातील विवादाच्या बाबतीत लवादासाठीची कार्यपद्धती ;

(छ) मानार्थ पदव्यांचे प्रदान ;

(ज) शिकवणी फी देण्यातून विद्यार्थ्यांना सूट देण्यासंबंधात आणि त्यांना शिष्यवृत्ती व अधिछात्रवृत्ती देण्यासाठी तरतुदी ;

(झ) प्रवेशाच्या धोरणासंबंधात व जागांच्या आरक्षणाच्या विनियमनासंबंधात तरतुदी ;

(ञ) विद्यार्थ्यांकडून घ्यावयाच्या फीसंबंधात तरतुदी ; आणि

(ट) विविध अभ्यासक्रमांमधील प्रवेश द्यावयाच्या जागांच्या संख्येसंबंधात तरतुदी.

(३) शासन, विद्यापीठाने सादर केलेल्या पहिल्या परिनियमांचा विचार करील आणि त्या परिनियमांत कोणतेही फेरबदल करणे त्यास आवश्यक वाटेल तर, त्या फेरबदलांसह, अशा परिनियमांना, ते प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून चार महिन्यांच्या आत, मान्यता देईल.

(४) राज्य शासन, त्याने मान्यता दिलेले पहिले परिनियम **राजपत्रात** प्रसिद्ध करील आणि त्यानंतर ते पहिले परिनियम, अशा प्रसिद्धीच्या दिनांकापासून अंमलात येतील.

नंतरचे परिनियम.

**३१.** (१) या अधिनियमाच्या तरतुदी आणि त्याखाली केलेले नियम यांना अधीन राहून, विद्यापीठाच्या नंतरच्या परिनियमांमध्ये पुढील सर्व किंवा कोणत्याही बाबींसाठी तरतूद करता येईल :—

(क) विद्यापीठाच्या नवीन प्राधिकरणांची निर्मिती ;

(ख) लेखेविषयक धोरण आणि वित्तीय कार्यपद्धती ;

(ग) विद्यापीठाच्या प्राधिकरणांमध्ये शिक्षकांचे प्रतिनिधित्व ;

(घ) नवीन विभागांची निर्मिती आणि विद्यमान विभाग बंद करणे किंवा त्यांची पुनर्रचना करणे ;

(ङ) पदके व बक्षिसे देण्यास प्रारंभ करणे ;

(च) पदांची निर्मिती आणि पदे रद्द करण्याची कार्यपद्धती ;

(छ) फीमध्ये सुधारणा करणे ;

(ज) निरनिराळ्या अभ्यासक्रमांसाठी प्रवेश द्यावयाच्या जागांच्या संख्येत फेरफार करणे ; आणि

(झ) या अधिनियमाच्या तरतुदींअन्वये परिनियमांद्वारे विनिर्दिष्ट करावयाच्या इतर सर्व बाबी.

(२) पहिल्या परिनियमाव्यतिरिक्त विद्यापीठाचे परिनियम हे, विनियामक मंडळाच्या मान्यतेने व्यवस्थापन मंडळाकडून करण्यात येतील.

(३) व्यवस्थापन मंडळाला, वेळोवेळी, नवीन किंवा आणखी परिनियम करता येतील किंवा या कलमामध्ये यात यापुढे तरतूद केलेल्या रीतीने अशा प्रकारे केलेल्या परिनियमांमध्ये सुधारणा करता येईल किंवा त्यांचे निरसन करता येईल :

परंतु, व्यवस्थापन मंडळ हे, विद्यापीठाच्या कोणत्याही विद्यमान मंडळाला, प्रस्तावावार मत मांडण्याची संधी देण्यात येईपर्यंत अशा प्राधिकरणाचा दर्जा, अधिकार किंवा रचना यांना बाधक ठरणारा कोणताही परिनियम करणार नाही किंवा परिनियमात कोणतीही सुधारणा करणार नाही, आणि अशा प्रकारे मांडलेले कोणतेही मत लेखी असेल व त्यावर विनियामक मंडळाकडून विचार करण्यात येईल.

(४) असा प्रत्येक परिनियम किंवा परिनियमांमध्ये भर घालणे किंवा परिनियमांमध्ये कोणतीही सुधारणा करणे किंवा त्यांचे निरसन करणे या बाबी शासनाच्या मान्यतेच्या अधीन असतील :

परंतु असे की, विद्यापरिषदेशी विचारविनिमय केल्याशिवाय, व्यवस्थापन मंडळाकडून, विद्यार्थ्यांची शिस्त, अध्यापन, शिक्षण व परीक्षण यांचा दर्जा यांना बाधक ठरणारा कोणताही परिनियम करण्यात येणार नाही.

**३२.** (१) विद्यापीठाचे पहिले आदेश, कुलगुरूकडून करण्यात येतील, त्या आदेशांना, विनियामक मंडळाकडून मान्यता मिळाल्यानंतर, ते शासनाच्या मान्यतेसाठी त्याच्याकडे सादर करण्यात येतील. पहिले आदेश.

(२) या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या किंवा परिनियमांच्या तरतुदींना अधीन राहून, व्यवस्थापन मंडळ हे, विद्यापीठाच्या उद्दिष्टांना चालना देण्यासाठी विनियामक मंडळाच्या मान्यतेने, त्याला योग्य वाटत असेल त्याप्रमाणे पहिले आदेश काढील आणि अशा आदेशांमध्ये, पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही बाबींसाठी तरतूद करता येईल :—

(क) विद्यापीठामध्ये विद्यार्थ्यांना प्रवेश देणे व त्यांची विद्यार्थी म्हणून नावनोंदणी करणे ;

(ख) विद्यापीठाच्या पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे यांसाठी निर्धारित करावयाचे अभ्यासक्रम ;

(ग) पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे व इतर शैक्षणिक विशेषोपाधी यांचे प्रदान, त्यासाठी किमान अर्हता व ते देण्याच्या व संपादन करण्याच्या संबंधात करावयाच्या उपाययोजना ;

(घ) अधिछात्रवृत्ती, शिष्यवृत्ती, पदके व बक्षिसे प्रदान करण्यासंबंधातील शर्ती ;

(ङ) परीक्षा मंडळे, परीक्षक व नियामक यांचा पदावधी व नियुक्तीची रीत आणि त्यांची कर्तव्ये यांसह परीक्षांची आखणी करणे ;

(च) विद्यापीठाच्या पदव्या आणि पदविका यांच्या विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकरिता आकारावयाची फी ;

(छ) विद्यापीठाच्या वसतिगृहांमधील विद्यार्थ्यांच्या निवासाच्या शर्ती ;

(ज) विद्यार्थ्यांविरुद्ध करावयाच्या शिस्तभंगाच्या कारवाईसंबंधीच्या तरतुदी ;

(झ) विद्यापीठाच्या शैक्षणिक वातावरणात सुधारणा करण्यासाठी ज्याची आवश्यकता वाटत असेल अशा इतर कोणत्याही मंडळाची निर्मिती, रचना व कार्ये ;

(ञ) उच्च शिक्षणाच्या बाबतीत इतर विद्यापीठांशी सहकार्य करण्याची व सहयोग देण्याची रीत ; आणि

(ट) या अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली केलेल्या परिनियमांद्वारे ज्या बाबींची आदेशात तरतूद करण्याची आवश्यकता आहे किंवा अशा इतर सर्व बाबी.

(३) पोट-कलम (२) अन्वये, कुलगुरूने सादर केलेल्या पहिल्या आदेशांवर शासन विचार करील आणि त्या आदेशांत कोणतेही फेरबदल करणे त्यास आवश्यक वाटेल तर, त्या फेरबदलांसह, त्या आदेशांना, ते मिळाल्याच्या दिनांकापासून चार महिन्यांच्या आत मान्यता देईल.

नंतरचे काढलेले आदेश. **३३.** (१) पहिल्या आदेशाव्यतिरिक्त सर्व आदेश विद्यापरिषदेकडून काढण्यात येतील व त्यास व्यवस्थापन मंडळाची मान्यता मिळाल्यानंतर नियामक मंडळाच्या मान्यतेसाठी त्याच्याकडे पाठविण्यात येतील.

(२) विद्यापरिषद ही एक तर, व्यवस्थापन मंडळाच्या व नियामक मंडळाच्या सूचनांचा अंतर्भाव करून आदेशामध्ये फेरबदल करील किंवा सूचनांचा अंतर्भाव न करण्याबद्दल कारणे देईल, आणि अशा कारणांसह, कोणतीही असल्यास, ते आदेश व्यवस्थापन मंडळाकडे परत पाठविल आणि नियामक मंडळ, विद्यापरिषदेच्या अभिप्रायांवर विचार करील आणि अशा फेरबदलांसह किंवा अशा फेरबदलांशिवाय विद्यापीठाच्या आदेशांना मान्यता देईल आणि त्यानंतर, नियामक मंडळाने मान्यता दिल्याप्रमाणे आदेश अंमलात येतील.

विनियम. **३४.** विद्यापीठांच्या प्राधिकरणास, कार्यकारी समितीच्या पूर्वमान्यतेला अधीन राहून, त्यांचे स्वतःचे आणि त्यांच्याकडून नियुक्त करण्यात आलेल्या समित्यांचे कामकाज चालविण्यासाठी, हा अधिनियम आणि त्याखाली करण्यात आलेले नियम, परिनियम आणि आदेश यांच्याशी सुसुंगत असे विनियम करता येतील.

प्रवेश. **३५.** (१) विद्यापीठामध्ये देण्यात यावयाचा प्रवेश हा काटेकोरपणे गुणवत्तेच्या आधारे देण्यात येईल.

(२) विद्यापीठातील प्रवेशाकरिता लागणारी गुणवत्ता ही, एकतर अर्हता परीक्षेमध्ये मिळविलेले गुण किंवा श्रेणी आणि पाठ्यांतर्गत व पाठ्येतर कार्यक्रमांमध्ये मिळविलेले नैपुण्य यांच्या आधारे किंवा तशा प्रकारचे अभ्यासक्रम चालविणाऱ्या एखाद्या विद्यापीठ अधिसंघाने घेतलेल्या किंवा राज्याच्या अन्य कोणत्याही अभिकरणाने घेतलेल्या राज्यस्तरीय प्रवेश परीक्षेमध्ये मिळविलेले गुण किंवा श्रेणी यांच्या आधारे निर्धारित करता येईल :

परंतु, व्यावसायिक व तांत्रिक अभ्यासक्रमांमधील प्रवेश हा केवळ प्रवेश परीक्षेमार्फतच देण्यात येईल.

(३) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग यांमधील विद्यार्थ्यांकरिता व अपंग विद्यार्थ्यांकरिता विद्यापीठांमधील प्रवेशसाठीच्या जागा ह्या राज्य शासनाच्या धोरणानुसार राखून ठेवण्यात येतील :

परंतु, कोणत्याही परिस्थितीत एकूण आरक्षण ५० टक्क्यांपेक्षा अधिक असणार नाही.

(४) प्रवेश देण्याच्या एकूण मान्यताप्राप्त क्षमतेपैकी, ७० टक्के जागा ह्या, महाराष्ट्रात अधिवास असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी राखून ठेवण्यात येतील.

फी ची रचना. **३६.** (१) विद्यापीठाला, वेळोवेळी, आपल्या फीची रचना तयार करता येईल आणि राज्य शासनाने या प्रयोजनासाठी घटित केलेल्या समितीच्या मान्यतेसाठी ती पाठविता येईल.

(२) शासन, विद्यापीठाकडून प्राप्त झालेल्या फी रचनेच्या प्रस्तावांचा आढावा घेण्यासाठी विहित करण्यात येईल अशा रीतीने, एक फी रचना आढावा समिती घटित करील.

(३) पोट-कलम (२) अन्वये नमूद केलेल्या समितीचा अध्यक्ष हा, सर्वोच्च न्यायालयातील किंवा अन्य न्यायालयातील सेवानिवृत्त न्यायमूर्ती असेल. समितीच्या अध्यक्षाची, उच्च न्यायालयाकडून शिफारस करण्यात येईल.

(४) समिती, विद्यापीठाने तयार केलेल्या फीच्या रचनेवर विचार करील, तिचा आढावा घेईल आणि प्रस्तावित फी—

(क) (एक) विद्यापीठाचा आवर्ती खर्च भागविण्यासाठी स्रोत निर्माण करण्याकरिता ; आणि

(दोन) विद्यापीठाचा आणखी विकास करण्यासाठी आवश्यक असलेल्या बचतींकरिता पुरेशी आहे ; आणि

(ख) त्यात अवाजवीपणे वाढ केलेली नाही ;

यांवर विचारविनिमय केल्यानंतर शासनाकडे आपल्या शिफारशी सादर करील.

(५) पोट-कलम (४) अन्वये शिफारशी प्राप्त झाल्यानंतर, जर शासनाची खात्री पटली तर, ती, फी रचनेला मान्यता देईल. शासनाने मान्यता देलेली फी ची रचना ही, पुढील सुधारणा करेपर्यंत वैध राहील.

(६) राज्य शासन स्वयं-अर्थसहाय्यित विद्यापीठामध्ये प्रवेश घेतलेल्या मागास वर्गांतील विद्यार्थ्यांसाठी कोणत्याही फीची प्रतिपूर्ती करणार नाही अथवा कोणतेही वित्तीय दायित्व घेणार नाही.

(७) विद्यापीठ पोट-कलम (५) अन्वये जी फी घेण्यास ते पात्र असेल त्या व्यतिरिक्त कोणत्याही नावाने संबोधली जाणारी अन्य कोणतीही फी आकारणार नाही.

**३७.** (१) अमिटी विद्यापीठाद्वारे अथवा त्याच्यावतीने, किंवा जी अशा परिसंस्थेच्या व्यवस्थापनाची प्रभारी आहे अथवा त्यास जबाबदार आहे अशा कोणत्याही व्यक्तीद्वारे, अशा परिसंस्थेतील कोणत्याही विद्यार्थ्याला कोणत्याही अभ्यासक्रमास प्रवेश दिल्याच्या आणि तो सुरू केल्याच्या, अथवा त्याला वरच्या वर्गात चढविल्याच्या मोबदल्यात त्याच्याकडून किंवा त्याच्या बाबतीत कोणतीही कॅपिटेशन फी गोळा करण्यात येणार नाही. ज्याबाबत महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (कॅपिटेशन फी घेण्यास प्रतिबंध) अधिनियम, १९८७ यानुसार कॅपिटेशन फी गोळा करण्यास प्रतिबंध केलेला आहे. कॅपिटेशन फी घेण्यास प्रतिबंध,

१९८८ चा महा ६.

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, व्यवस्थापनास, नवीन शिक्षण संस्था सुरू करण्याकरिता अथवा शिष्यवृत्त्या, पारितोषिके वा तत्सम बाबींचे प्रदान करता यावे म्हणून दाननिधी उभारण्याकरिता, लोकहितैषी व्यक्ती किंवा संघटना किंवा सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था किंवा अन्य कोणताही व्यक्तींचा संघ यांच्याकडून विहित केलेल्या रीतीने, सद्भावनेने रोख वा वस्तुच्या स्वरूपात देणग्या गोळा करता येतील अथवा स्वीकारतेवेळी, व्यवस्थापन, ते चालवित असलेल्या कोणत्याही शैक्षणिक परिसंस्थेमध्ये अशा देणग्यांच्या मोबदल्यात कोणत्याही जागा राखून ठेवणार नाही.

अशा देणग्या स्वीकारण्याच्या मोबदल्यात, अशा परिसंस्थेत कोणत्याही विद्यार्थ्याला प्रवेश देण्यासाठी कोणतीही जागा राखून ठेवण्यात आली असल्यास, अशी देणगी स्वीकारणे हे कॅपिटेशन फी गोळा करणे आहे असे मानण्यात येईल.

**३८.** प्रत्येक विद्यासत्राच्या सुरुवातीस आणि कोणत्याही बाबतीत प्रत्येक कॅलेंडर वर्षाच्या ३० जूनहून उशीरा नसेल अशा कालावधीत, विद्यापीठ, ते आयोजित करत असलेल्या प्रत्येक पाठ्यक्रमासाठी सत्रनिहाय किंवा, यथास्थिति, वार्षिक परीक्षांचे वेळापत्रक तयार करील आणि प्रसिद्ध करील आणि काटेकोरपणे अशा अनुसूचीची अंमलबजावणी करील : परीक्षा.

**स्पष्टीकरण.—**परीक्षेची अनुसूची याचा अर्थ, परीक्षेचा भाग असलेल्या प्रत्येक प्रश्नपत्रिकेची वेळ, दिवस व दिनांक याविषयीचा तपशील दिलेला तक्ता असा आहे आणि त्यात प्रात्यक्षिक परीक्षांच्या तपशीलाचादेखील समावेश असेल.

परंतु, जर कोणत्याही कारणास्तव, विद्यापीठ या अनुसूचीचे पालन करण्यास असमर्थ ठरले तर, ते, प्रसिद्ध केलेल्या परीक्षेच्या अनुसूचीत पालन का करता आले नाही त्याची तपशीलवार कारणे नमूद करणारा अहवाल जमेल तितक्या लवकर शासनाला सादर करेल. शासन, त्यावर भविष्यात चांगले पालन होण्यासाठी त्याला योग्य वाटेल त्याप्रमाणे असे निदेश देईल.

**३९.** (१) विद्यापीठ, त्याने घेतलेल्या प्रत्येक परीक्षेचा निकाल त्या विशिष्ट अभ्यासाक्रमाच्या परीक्षेच्या अखेरच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत जाहीर करण्याचा अटोकाट प्रयत्न करील आणि कोणत्याही परिस्थितीत असा दिनांकापासून उशिरात उशिरा म्हणजे पंचेचाळीस दिवसांच्या आत तो घोषित करील : निकाल जाहीर करणे.

परंतु, पूर्वोक्त पंचेचाळीस दिवसांच्या कालावधीच्या आत, अंतिमरीत्या कोणत्याही परीक्षेचा निकाल जाहीर करणे कोणत्याही कारणांमुळे विद्यापीठाला शक्य झाले नाही तर, ते, अशा विलंबाची तपशीलवार कारणे नमूद करून शासनाला एक अहवाल सादर करील. शासन त्यावर भविष्यात चांगले अनुपालन होण्यासाठी त्याला योग्य वाटेल असे निदेश देईल.

(२) विद्यापीठाने कलम ३८ किंवा, यथास्थिति, त्या कलमान्वये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या परीक्षेच्या अनुसूची पालन केले नाही केवळ याच कारणामुळे कोणतीही परीक्षा किंवा परीक्षेचा निकाल अवैध समजण्यात येणार नाही.

दीक्षांत समारंभ.

**४०.** विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ हा, पदव्या,पदविका प्रदान करण्याकरिता किंवा इतर कोणत्याही प्रयोजनाकरिता परिनियमाद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा रीतीने प्रत्येक विद्यावर्षात घेतला जाईल.

विद्यापीठाची अधिस्वीकृति.

**४१.** विद्यापीठ, त्याच्या स्थापनेपासून तीन वर्षांच्या आत, राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्वीकृति परिषद, बेंगलोर यांचे अधिस्वीकृति मिळवील आणि शासनाला व विद्यापीठाने हाती घेतलेल्या अभ्यासक्रमाशी संबंधित असतील अशा इतर नियामक मंडळांना, विद्यापीठाला राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्वीकृती परिषदेने (नॅकने) दिलेल्या श्रेणीविषयी कळवील. विद्यापीठ, त्यानंतर प्रत्येक पाच वर्षांच्या कालांतराने अशा अधिस्वीकृतिचे नवीकरण करण्यात येईल.

विद्यापीठाने नियामक मंडळांचे नियम, विनियम प्रमाणके इत्यादींचे अनुसरण करणे.

**४२.** या अधिनियमात काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, विद्यापीठास, नियामक मंडळाचे सर्व नियम, विनियम, प्रमाणके इत्यादींचे अनुपालन करणे आणि अशा सर्व सोयीसुविधांची तरतूद करणे आणि अशा मंडळांना त्यांची कर्तव्ये पार पाडण्यासाठी आणि त्यांची कार्य पार पाडण्यासाठी त्यांना आवश्यक असल्याप्रमाणे सहाय्य करणे बंधनकारक असेल.

वार्षिक अहवाल.

**४३.** (१) विद्यापीठाचा वार्षिक अहवाल हा, व्यवस्थापन मंडळाकडून तयार करण्यात येईल ज्यात, इतर बाबींबरोबरच विद्यापीठाने त्यांच्या उद्दिष्टांच्या पूर्ततेबाबत केलेल्या उपाययोजनांचा अंतर्भाव असेल आणि तो नियामक मंडळाकडून मान्य करण्यात येईल आणि त्याची प्रत प्रायोजक मंडळास सादर करण्यात येईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये तयार केलेल्या वार्षिक अहवालाच्या प्रती शासनासदेखील सादर करण्यात येतील.

(३) राज्य शासन, असा अहवाल, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्याची व्यवस्था करेल.

वार्षिक लेखे व लेखापरीक्षा.

**४४.** (१) विद्यापीठाचे ताळेबंदासह वार्षिक लेखे हे, व्यवस्थापन मंडळाच्या निदेशांअन्वये तयार करण्यात येतील आणि त्या प्रयोजनासाठी विद्यापीठाने नियुक्त केलेल्या लेखापरीक्षकाद्वारे प्रत्येक वर्षी किमान एकदा त्या वार्षिक लेख्यांची लेखापरीक्षा करण्यात येईल.

(२) वार्षिक लेख्यांची, त्यावरील लेखापरीक्षा अहवालासह, एकत्रित एक प्रत नियामक मंडळाला सादर करण्यात येईल.

(३) नियामक मंडळाच्या म्हणण्यासह, वार्षिक लेखे व लेखापरीक्षा अहवालाची एक प्रत प्रायोजक मंडळास सादर करण्यात येईल.

(४) पोट-कलम (१) अन्वये तयार केलेल्या वार्षिक लेख्यांच्या व ताळेबंदाच्या प्रती शासनालादेखील सादर करण्यात येतील.

(५) विद्यापीठाच्या लेखा व लेखापरीक्षा अहवालात दिला जाणारा शासनाचा सल्ला, कोणताही असल्यास, नियामक मंडळासमोर ठेवण्यात येईल आणि नियामक मंडळ, त्याला योग्य वाटतील असे निदेश देईल आणि त्यावरील अनुपालनाबाबत शासनाला कळविण्यात येईल.

विद्यापीठाचे निरीक्षण करण्याचा शासनाचा अधिकार.

**४५.** (१) अध्यापनाची मानके, परीक्षा व संशोधन किंवा विद्यापीठाशी संबंधित इतर कोणतीही बाब निश्चित करून घेण्याच्या प्रयोजनासाठी, शासन, कुलगुरुशी विचारविनिमय करून, त्यास योग्य वाटेल अशा व्यक्ती किंवा व्यक्तींकडून, विहित करण्यात येईल अशारीतीने करावयाच्या मूल्यांकनाची व्यवस्था करील.

(२) शासन, सुधारत्मक कारवाईसाठी अशा मूल्यांकनाच्या परिणामाबाबत, त्याच्या शिफारशी विद्यापीठाला कळवील आणि विद्यापीठ, शिफारशींच्या अनुपालनाची सुनिश्चिती होण्यासाठी आवश्यक असेल त्याप्रमाणे अशी सुधारात्मक उपाययोजना करील.

(३) जर विद्यापीठ, पोट-कलम (२) अन्वये केलेल्या शिफारशींचे वाजवी वेळेत अनुपालन करण्यात कसूर करील तर शासन, त्याला योग्य वाटतील असे निदेश देईल, जे विद्यापीठावर बंधनकारक असतील.

प्रायोजक मंडळाकडून विद्यापीठाची बरखास्ती.

**४६.** (१) प्रायोजक मंडळ, शासन, विद्यापीठाचे कर्मचारी व विद्यार्थी यांना किमान एक वर्ष आगाऊ, तशा आशयाची नोटीस देऊन विद्यापीठ बरखास्त करील :

परंतु, विद्यापीठाची बरखास्ती ही, केवळ नियमित पाठ्यक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या शेवटच्या तुकडीने त्यांचा पाठ्यक्रम पूर्ण केल्यानंतर आणि त्यांना पदव्या, पदविका किंवा, यथास्थिति, पुरस्कार प्रदान करण्यात आल्यानंतरच अंमलात येईल.

(२) विद्यापीठाच्या बरखास्तीनंतर, विद्यापीठाची सर्व मत्ता व दायित्त्वे ही प्रायोजक मंडळाकडे निहित होईल :

परंतु, प्रायोजक मंडळ, विद्यापीठाच्या स्थापनेच्या पंचवीस वर्षांपूर्वी विद्यापीठ बरखास्त करील तर, सर्व भारातून मुक्त अशी विद्यापीठाची सर्व मत्ता ही, शासनाकडे निहित होईल.

विवक्षित परिस्थितीमध्ये राज्य शासनाला विशेष अधिकार असणे.

**४७.** (१) जर राज्य शासनाला असे दिसून आले की, विद्यापीठाने या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदी किंवा त्याखाली तयार केलेले कोणतेही नियम, परिनियम किंवा आदेशांचे उलंघन केलेले आहे किंवा या अधिनियमान्वये शासनाकडून देण्यात आलेल्या कोणत्याही निदेशांचे उल्लंघन केलेल आहे किंवा अमिटी विद्यापीठ अधिनियम, २०१४ याच्या कलम ५ अन्वये हाती घेण्यात आलेले कोणतेही उपक्रम राबविणे बंद केले आहे किंवा विद्यापीठामध्ये आर्थिक गैरव्यवस्थापन किंवा कुप्रशासनाची परिस्थिति उद्‌भवली आहे, असे शासनास दिसून आले तेव्हा शासन विद्यापीठाचे समापन करण्याचा आदेश देण्यात येऊ नये याबाबत पंचेचाळीस दिवसांच्या आत विद्यापीठावर कारणे दाखवा नोटीस बजावील.

२०१४ चा महा. १३.

(२) पोट-कलम (१) अन्वये देण्यात आलेल्या नोटीसीकडे विद्यापीठाचे उत्तर मिळाल्यावर, हा आधिनियम किंवा त्याखाली केलेले नियम, परिनियम किंवा आदेश यांच्या सर्व किंवा कोणत्याही तरतूदींचे उल्लंघन झाल्याचे किंवा या अधिनियमान्वये शासनाकडून देण्यात आलेल्या निदेसांचे उल्लंघन झाल्याचे किंवा अमिटी विद्यापीठ अधिनियम, २०१४ याच्या कलम ५ च्या पोट-कलमाअन्वये हाती घेतलेले उपक्रम राबविण्याचे बंद केल्याचे किंवा आर्थिक गैरव्यवस्थापनाचे अथवा कुप्रशासनाचे व प्रथम दर्शनी प्रकरण तयार होत असल्याबाबत शासनाची खात्री पटली तर, शासन त्यास आवश्यक वाटेल अशा चौकशीचे आदेश देईल.

२०१४ चा महा. १३.

(३) शासन, पोट-कलम (२) अन्वये कोणत्याही चौकशीच्या प्रयोजनार्थ, कोणत्याही अभिकरणांची चौकशी करण्यासाठी आणि त्यावर अहवाल देण्यासाठी एक किंवा अनेक चौकशी अधिकाऱ्यांची नियुक्ती करील.

(४) पोट-कलम (३) अन्वये नियुक्त केलेल्या एक किंवा अनेक चौकशी अधिकाऱ्यांना, पुढील प्रकरणांच्या बाबतीत, दाव्याची न्यायचौकशी करतांना दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ अन्वये दिवाणी न्यायालयाला जे अधिकार असतात तेच अधिकार असतील :—

१९०८ चा ५.

(क) कोणत्याही व्यक्तीला समक्ष पाठविणे व तिला उपस्थित राहण्यास भाग पाडणे आणि तिची शपथेवर तपासणी करणे ;

(ख) पुराव्याविषयी माहिती देईल असा कोणताही दस्तऐवज किंवा कोणतेही साहित्य शोधून काढण्यास अणि सादर करण्यास सांगणे ;

(ग) कोणत्याही न्यायालयातून किंवा कार्यालयातून कोणताही सरकारी अभिलेख मागविणे; आणि

(घ) विहित करण्यात येईल अशी कोणतीही इतर बाब.

(५) या अधिनियमान्वये चौकशी करणारा अधिकारी किंवा चौकशी करणारे चौकशी अधिकारी हे, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ याचे कलम १९५ आणि प्रकरण २६ याच्या प्रयोजनांसाठी दिवाणी न्यायालय असण्याचे मानण्यात येईल.

१९७४ चा २.

(६) पोट-कलम (३) अन्वये नियुक्त केलेल्या अधिकाऱ्याकडून किंवा अधिकाऱ्यांकडून चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर, विद्यापीठाने या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेले नियम, पिरनियम अध्यादेश याच्या सर्व किंवा कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन केल्याबद्दल किंवा या अधिनयमान्वये त्याने दिलेल्या कोणत्याही निदेशांचे उल्लंघन केल्याबद्दल किंवा अमिटी विद्यापीठ, २०१४ याच्या कलम ५ अन्वये त्यांने दिलेल्या हमीपत्राचे पालन करण्याचे थांबविल्याबद्दल किंवा विद्यापीठाचे आर्थिक गैरव्यवहार आणि गलथान कारभार होत असल्याबद्दल आणि त्यामुळे विद्यापीठाच्या विद्याविषयक स्थानाला धोका पोहोचत असल्याबद्दल राज्य शासनाची खात्री पटली, तर ते विद्यापीठाचे परिसमापन करण्याचे आदेश देईल आणि प्रशासनाची नियुक्ती करील.

२०१४ चा महा. १३.

(७) पोट-कलम (६) अन्वये नियुक्त केलेल्या प्रशासकास या अधिनियमाखालील नियामक मंडळाचे सर्व अधिकार असतील आणि त्यास नियामक मंडळ व व्यवस्थापन मंडळाच्या अधीनतेने सर्व कर्तव्य पार पाडता येतील आणि तो, विद्यापीठाच्या नियमित अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांची शेवटची तुकडी त्यांना अभ्यासक्रम पूर्ण करीपर्यंत आणि त्यांनी पदवी, पदविका किंवा यथास्थिति; पुरस्कार प्रदान करण्यात येईपर्यंत विद्यापीठाचे कामकाज पाहिल.

(८) नियमित अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या शेवटच्या तुकड्यांना पदवी, पदविका किंवा यथास्थिति; पुरस्कार प्रदान केल्यानंतर प्रशासन त्यासंबंधीचा अहवाल शासनास देईल.

(९) पोट-कलम (८) अन्वये अहवाल प्राप्त झाल्यानंतर, शासन, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, विद्यापीठ रद्द करण्याचे आदेश देईल आणि अशी अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून असे विद्यापीठ संपुष्टात येईल आणि असा दिनांकापासून विद्यापीठाच्या सर्व मत्ता व दायित्वे पुरस्कर्त्या विकायाकडे निहित होतील.

नियम करण्याचा अधिकार.

**४८.** (१) शासनास, अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, नियम करता येतील.

(२) पूर्वगामी अधिकारांच्या सर्वसाधारणतेला बाधा न पोहोचवता, अशा नियमांमध्ये सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही बाबींसाठी तरतूद करता येईल, ते असेः—

(क) कलम ४७ च्या पोट-कलम (४) च्या खंड (घ) अन्वये विहित करावयाच्या बाबी; आणि

(ख) या अधिनियमान्वये, नियमांद्वारे विहित करणे आवश्यक असलेल्या किंवा विहित करता येतील अशा इतर बाबी.

(३) या अधिनियमाखाली करण्यात आलेले सर्व नियम, अशाप्रकारे ते करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनांत मिळून एकूण दहा दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येतील आणि ज्या अधिवेशनात ते अशा रीतीने ठेवण्यात येतील ते अधिवेशनात किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी, अशा नियमांपैकी कोणत्याही नियमात राज्य विधानमंडळाने कोणतेही फेरबदल केला तर किंवा असा कोणताही नियम करण्यात येऊ नये याबाबत त्याची सहमती झाली तर, असे नियम, त्यानंतर अशा फेरबदल स्वरुपात अंमलात येतील किंवा याथास्थिति, मुलीच अंमलात येणार नाहीत तथापि, अशा कोणत्याही फेरबदलामुळे किंवा विलोपनामुळे पूर्वी केलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधीग्राह्यतेस बाधा येणार नाही.

अडचणी दूर करण्याचा अधिकार.

**४९.** (१) या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना कोणतेही अडचण उद्‌भवल्यास, शासनास, शासकीय राजपत्रात आदेश प्रसिद्ध करून ती अडचण दूर करण्यासाठी त्यास आवश्यक किंवा इष्ट असल्याचे वाटतील अशा या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसतील अशा तरतुदी करता येतील.

(२) या कलमान्वये काढण्यात आलेला प्रत्येक आदेश, तो काढण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळासमोर ठेवण्यात येईल.

नियमक मंडळ.

**५०.** नियमक मंडळ यंत्रणेची तरतूद करण्याच्या प्रयोजनार्थ, आणि अध्ययन, परीक्षा, संशोधन, विस्तार कार्यक्रम यांच्या समुचित दर्जाची तसेच विद्यापीठाकडून विद्यार्थ्यांच्या हिताचे रक्षण व कर्मचाऱ्यांच्या योग्य सेवा शर्तीचे परिरक्षण करण्यात येत असल्याची सुनिश्चिती करण्याच्या प्रयोजनार्थ, राज्य शासन स्वतंत्र मंडळ म्हणून विहित करण्यात येईल अशा रीतीने एक नियामक मंडळ स्थापन करील.

**५१.** क्र. युएसजी २००६/(२५४/२००६)/युएनआय-४ दिनांक २९ मे २०१३ रोजीच्या शासन निर्णयानुसार प्रायोजक मंडळाने दिलेल्या हमीनुसार उद्दिष्टांच्या पूर्ततेची आणि स्वयं-अर्थसहाय्यित विद्यापीठासाठीच्या मार्गदर्शक तत्त्वांच्या अनुपालनाची पडताळणी करण्यासाठी सुनिश्चती करण्यासाठी एक सचिवीय समिती असेल. ही समिती शासनाला आपला अहवाल सादर करील. त्यानंतर राज्य शासन अधिसूचना प्रसिद्ध करील आणि त्यानंतरच हे विद्यापीठ सुरू होईल. सचिवीय समिती.

ही समिती, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, वित्त विभाग आणि नियोजन विभाग यांचे सचिव यांनी मिळून बनलेली असेल.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.